# Question Paper
## Set- II
## Std. – 10th MM/Semi
## Subject – Geography



**Time: 3 Hrs.** **Marks : 40**

**प्र.१ दिलेल्या पर्यायापैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.** ४

१) ॲमेझॉनच्या खोऱ्यात सुमारे ______ मिमी पाऊस पडतो.
अ) १००० ब) २००० क) ३००० ड) ५०००

२) ब्राझीलमध्ये रस्त्यांची घनता ______भागात केंद्रित झालेली आहे.
अ) पूर्व ब) पश्चिम क) उत्तर ड) दक्षिण

३) अरवली पर्वताच्या पायथ्याशी _______ पठार आहे.
अ) बुंदेलखंड ब) मेवाड क) माळवा ड) दख्खनचे

४) सावो पावलोचा सुपीक प्रदेश ______ च्या उत्पादनासाठी सुयोग्य आहे.
अ) अननस ब) चहा क) ताग ड) कॉफी

**प्र.२ योग्य जोड्या जुळवा.** ४

| अ | | ब |
|---|---|---|
| १) ब्राझीलमधील उच्चभूमी | अ) | लोकसंख्या दाट |
| २) सुपीक जमीन | ब) | रानटी गाढव |
| ३) आसाम-दलदलीचा प्रदेश | क) | लोकसंख्येची घनता मध्यम |
| ४) वाळवंटी प्रदेश | ड) | जिराफ |
| | ई) | एकशिंगी गेंडा |

**प्र.३ खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही चार)** ४

१) क्षेत्रभेट म्हणजे काय?

२) पर्यटकांना आकर्षित करणारी ब्राझीलमधील दोन शहरे कोणती?

३) ब्राझीलमधील ॲमेझॉन नदीचा उगम कोठे आहे?

४) ब्राझीलमध्ये सुरवातीच्या वस्त्या कोणी निर्माण केल्या?


५) भारत आणि ब्राझील देश कोणत्या प्रकारात मोडतात?

**प्र.४ अ) दिलेल्या ब्राझीलच्या नकाशा आरखड्यात पुढील घटक दाखवा. (कोणतेही चार)** ४

१) रिओ दि जनेरिओ २) आमापा ३) ॲमेझॉनचे खोरे

४) दक्षिण अटलांटिक महासागर ५) ब्राझीलिया ६) ॲमेझॉनास

आ) दिलेल्या आकृतीचे वाचन करून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. ४




१) भारताच्या पूर्वेला असलेला देश सांगा.

२) भारतात एकूण किती घटकराज्ये आहेत?

३) भारताचा भाग असलेल्या दोन द्वीपसमूहांची नावे सांगा.

४) भारताच्या उत्तरेला असलेले देश सांगा.

५) भारताच्या दक्षिणेकडील देश सांगा.

६) भारताच्या मध्यातून कोणते वृत्त जाते?

**प्र.५ भौगोलिक कारणे लिहा. (कोणतेही दोन)** ६

१) उत्तर भारतीय मैदानी प्रदेशात लोहमार्गांचे जाळे विकसित झाले आहे.

२) भारताप्रमाणे ब्राझीलमध्येही प्राणी व वनसंवर्धनाची गरज आहे.

३) ब्राझीलमधील दरडोई जमीनधारणा भारताच्या तुलनेत जास्त आहे.

४) ब्राझीलमध्ये लोकवस्तीचे केंद्रीकरण वाढत आहे.

**प्र.६ अ) दिलेल्या माहितीच्या आधारे रेषालेख तयार करा व त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा.** ६

| भारत नागरीकरणाचा कल | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **वर्ष** | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ | २०११ |
| **नागरीकरण** | १८.० | १८.२ | २३.३ | २५.७ | २७.८ | ३१.२ |


१) कोणत्या दशकात नागरीकरण सर्वाधिक होते?


२) कोणत्या दशकात नागरीकरणाची वाढ अतिशय कमी होती?

३) रेषालेखाचा कल पाहता नागरीकरणाबाबत तुम्ही कोणता निष्कर्ष काढाल?

**किंवा –** दिलेल्या आलेखाचे वाचन करून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. ६

**लिंग गुणोत्तर :**




१) वरील आलेख काय दर्शवतात?

२) लिंग गुणोत्तर म्हणजे काय?

३) कोणत्या देशाचे लिंग गुणोत्तर जास्त आहे?

४) ब्राझीलमध्ये कोणत्या सालापासून स्त्रियांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे?

५) आलेखावरून कोणत्या देशात पुरूषांची संख्या स्त्रियांपेक्षा अधिक आहे?

६) भारतात कोणत्या वर्षांपासून लिंगगुणोत्तरात थोडी वाढ झाली आहे?

**प्र.७ खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** ८

१) ब्राझीलमधील संदेशवहन आणि भारतातील संदेशवाहन स्पष्ट करा.

२) ब्राझील व भारताला कोणत्या पर्यावरणीय समस्यांना तोंड द्यावे लागते?

३) ब्राझीलच्या पश्चिम भागात खाणकाम व्यवसायाचा विकास अल्प का झाला आहे?